# बकऱ्या चोरी करणारे आरोपी पोलीस स्टेशन सेलू येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

दिनांक २४-०२-२०२२ रोजी फिर्यादी श्री जितेंद्र बाबारावजी बडे, रा. केळझर यांच्या घरातील बंड्या मधून दोन पांढऱ्या रंगाचे बोकडे प्रती बोकडा किंमत १५,०००/- रू. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन सेलू येथे अप क्रमांक १०५/२०२२ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून तपास सुरू करण्यात आला तपासादरम्यान केळझर येथे राहणारा योगेश खंडाळे याने सदर बोकड चोरी केल्याबाबत मुखबिरकडून मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन आरोपीस ताब्यात घेऊन विचारपूस केली असता आरोपीने त्याच्या मित्र अखिल तेलरांधे याच्या सोबत मिळून दोन पांढऱ्या रंगाचे बोकडे चोरी करून त्याच्या बंड्यावर बांधून ठेवल्याचे सांगितल्याने आरोपी क्र. १) योगेश वसंतरावजी खंडाळे, वय ३१ वर्ष, आरोपी क्र. २) अखिल राजू तेलरांधे, वय २७ वर्ष, दोन्ही रा. केळझर यांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून दोन पांढऱ्या रंगाचे बोकड किंमत ३०,०००/- रू व चोरीच्या गुन्ह्यात वापरलेली जुनी वापरती होंडा शाईन मोटारसायकल क्रमांक एमएच-३२/एस-०४६९ एकूण किंमत ६५,०००/- रू. चा माल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री रवींद्र गायकवाड, पोलीस स्टेशन सेलू याचे निर्देशाप्रमाणे पोउपनी. सुरेन्द्र कोहळे, नितीन नलवडे, पोलीस अंमलदार अखिलेश गव्हाणे, अनिल भोवरे, नारायण वरठी, सचिन वाटखेडे, कपिल मेश्राम, लेखा राठोड यांनी केली.